# संघर्ष क्रीडा मंडळ चिपळूण

## वार्षिक अहवाल सन २०२१ - २२

सन २०२१-२२ सालचा वार्षिक अहवाल सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. या वर्षी कोविड मुळे खूप कालावधी कबड्डी बंद होती. वर्षाच्या शेवटी संस्थेचा संघ विविध कबड्डी स्पर्धांमध्ये सहभागी झाला. खेळाडूंसाठी प्रशिक्षण व सराव आयोजित करण्यात आले होते.

**चिपळूण तालुका कबड्डी असोसिएशन, आयोजित कुमार गट तालुका निवड चाचणी कबड्डी स्पर्धा नोव्हेंबर २०२१.**

या कुमार गटाच्या निवड गट चाचणी कबड्डी स्पर्धेत आपल्या संस्थेचे वैभव उंडरे व सुयश कदम यांची चिपळूण तालुका संघात निवड झाली. सदरचा संघ कुमार गट जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत सहभागी झाला.

**चिपळूण तालुका कबड्डी असोसिएशन, आयोजित पुरुष खुलागट तालुका निवड चाचणी व कबड्डी स्पर्धा जानेवारी २०२२.**

या निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत आपल्या संघाचे ऋषिकेश भोजने, मंगेश भुवड, सुयश कदम, आणि श्रेयस आंब्रे या चार खेळाडूंची चिपळूण तालुका कबड्डी संघात निवड झाली आणि सदरचा संघ रत्नागिरी जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत सहभागी झाला.



**श्री. मनोज रावराणे यांच्या वाढदिवसानिमित्त फोंडा घाट मित्र मंडळ, आयोजित खुला गट राज्यस्तरीय स्पर्धा २७ जानेवारी ते २९ जानेवारी २०२२.**

फोंडा घाट येथे आयोजित केलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत आपल्या संघाने फोंडा घाट संघाचा पराभव केला आणि दुसऱ्या फेरीत मालवण संघाबरोबर खेळून विजय प्राप्त केला अंतिम सामना महापुरुष पोलीस रत्नागिरी या संघाबरोबर झाला यामध्ये आपला संघ पराभूत होऊन अंतिम उपविजेते पद पटकावले. या स्पर्धेत श्री. ऋषिकेश भोजने हा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून घोषित करण्यात आला.

**खेलो इंडिया अंतर्गत १८ वर्षाखालील जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा फेब्रुवारी २०२२.**

आपल्या संघाने उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली आणि संघ पराभूत झाला संघाचा खेळाडू वैभव उंडरे याची विभागीय स्तरावर निवड झाली.

**जय हनुमान क्रीडा मंडळ खेड, आयोजित जिल्हास्तरीय खुल्या गटाची कबड्डी स्पर्धा १८ ते २० फेब्रुवारी २०२२.**



आपल्या संघाने पहिल्याच फेरीत जय हनुमान क्रीडा मंडळ खेड या संघाचा पराभव केला आणि दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या फेरीचा सामना कला क्रीडा केंद्र भरणे या संघाबरोबर झाला या संघाचा १८ गुणांनी पराभव करून संघाने तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. तिसऱ्या व उपांत्य फेरीतील सामना नवलाई क्रीडा मंडळ तुंबाड या संघाबरोबर झाला, या अटीतटीच्या सामन्यात आपला संघ एक गुणांनी पराभूत झाला स्पर्धेतील चतुर्थ क्रमांकाचे बक्षीस आपल्या संघाला मिळाले.

**वेळणेश्वर ग्रामस्थ यांचे तर्फे महाशिवरात्र निमित्त जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा दिनांक २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२२.**

सेवन स्टार गुहागर या संघाला पहिल्या फेरीत पराभूत करून संघ दुसऱ्या फेरीत गजानन संघ केळशी या संघाबरोबर सामना खेळला. गजानन संघर्ष केळशी या संघाला पराभूत करून संघ उपांत्य फेरीत दाखल झाला. उपांत्य फेरीचा सामना महापुरुष रत्नागिरी या संघाबरोबर झाला आणि या सामन्यात आपल्या संघाला पराभव पत्करावा लागला. सदर स्पर्धेत ऋषी भोजने, अक्षय रेडीज यांनी उत्कृष्ट चढायांचा खेळ केला.

**शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. सागर बांदेकर व श्री. विलास जाधव यांची संघर्ष क्रीडा मंडळाच्या मैदानावर सदिच्छा भेट**

दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ रोजी संघर्ष क्रीडा मंडळाच्या मैदानावर शिवछत्रपती पुरस्कार विजेते, दबंग दिल्ली प्रो कबड्डी संघाचे कोच राष्ट्रीय खेळाडू आणि महिंद्रा अँड महिंद्रा संघाचे हेड कोच श्री. सागर बांदेकर सर व शिवछत्रपती पुरस्कार विजेते राष्ट्रीय खेळाडू आणि महिंद्रा अँड महिंद्रा व्यवसायिक कबड्डी संघाचे सह प्रशिक्षक श्री. विलास जाधव सर यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांच्यासमवेत दबंग दिल्ली, पुणेरी पलटण या सारख्या प्रो कबड्डी संघामधून प्रतिनिधित्व केलेला गतवर्षी झालेल्या राष्ट्रीय कब्बड्डी स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य पुरुष संघाचे कर्णधारपद भुषवलेला राष्ट्रीय खेळाडू महिंद्रा अँड महिंद्रा या संघाचा श्री. स्वप्नील शिंदे व श्री. शेखर तटकरे आणि स्वप्नील शिंदे यांचे बंधू जितेंद्र शिंदे उपस्थित होते. संघर्ष क्रीडा मंडळाच्या वतीने त्यांचे स्वागत व सन्मान या ठिकाणी करण्यात आला. दरम्यान या कार्यक्रमानिमित्त राष्ट्रीय खेळाडू स्वप्नील शिंदे व बांदेकर सर यांनी मंडळाच्या खेळाडूंना योग्य असे मार्गदर्शन केले व खेळासाठी घ्यावी लागणारी मेहनत याचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष श्री. नयन साडविलकर, सचिव श्री. विश्वजीत यादव खजिनदार श्री. परेश जानवलकर उपस्थित होते.

यावर्षी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होताना ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांना धन्यवाद. तसेच खेळाडूंना प्रशिक्षण व सरावा दरम्यान मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षकांना धन्यवाद. संस्थेला वेळोवेळी देणगी देणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना धन्यवाद.